दै. मराठवाडा नेता दि. ०८/१२/२५

# पोलिसांकडून पोसको गुन्ह्यातील आरोपी तीन तासात जेरबंद



**नांदेड : (म नेता)**

भाग्यनगर पोलिसांनी एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या एका आरोपीला तीन तासांच्या आत अटक केली असून त्यांच्या विरोधात भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असताना लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील नळेगाव येथून जेरबंद केले आहे.

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ५ डिसेंबर रोजी एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घटना घडली होती. भाग्यनगर पोलिसांनी सदर मुलीच्या तक्रारीवरुन आरोपी मल्हारी उर्फ आकाश विनायक येरमूनवाड यांच्या विरोधात पोसको अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पोलिस निरीक्षक संतोष तांबे यांनी सदर आरोपीला अटक करण्याचे आदेश गुन्हे शोध पथकाला दिले होते.

सहाय्यक पोलिस निरीक्षक अनुपा केंद्रे यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शोध पथकातील पोलिस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले व विनोद देशमुख यांनी सदर आरोपीची माहिती काढली असता आरोपी मल्हारी उर्फ आकाश विनायक येरमूनवाड हा लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील नळेगाव येथे असल्याचे दिसून आले. पोलिस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले व विनोद देशमुख यांनी तातडीने नळेगावकडे धाव घेतली. मात्र सदर आरोपींचा मोबाईल बंद असल्यामुळे आरोपींचा शोध घेण्यात अडथळा आला. मात्र पोलिसांनी गोपनिय रित्या माहिती घेतली असता सदर आरोपी हा एका पानटपरीवर असल्याचे आढळून आले. मात्र सदर आरोपीला ताब्यात घेण्यास गेले असता आरोपी एम एच २६ सी एक्स ५६२६ क्रमांकाच्या स्कुटीवरुन पळून जात असताना पोलिसांनी पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. भाग्यनगर पोलिसांनी सदर आरोपींचा तीन तासात शोध घेऊन त्यास जेरबंद केले. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर वैंजने यांच्या नेतृत्वाखाली पोलिस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी, सहाय्यक पोलिस निरीक्षक अनुपा केंद्रे व पोलिस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले, विनोद देशमुख यांनी केली आहे.